दिनांक : १३/०९/२०२१

प्रेस नोट

**सार्वजनिक बांधकाम विभाग, कल्याण येथील शाखा अभियंत्यास लाचेची रक्कम स्विकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे पथकाने ताब्यात घेतले.**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | ठाणे |
| पोलीस ठाणे गुन्हा नोंद क्रमांक | महात्मा फुले चौक पोलीस स्टेशन, कल्याण |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | अविनाश पांडुरंग भानुशाली, वय ५७ वर्षे, शाखा अभियंता (वर्ग २), सार्वजनिक बांधकाम विभाग, कल्याण. |
| मागितलेल्या लाचेची रक्कम | १,००,०००/– रूपये |
| स्विकारलेल्या लाचेची रक्कम | १,००,०००/– रूपये |
| थोडक्यात हकिकत | यातील तक्रारदार यांच्या आशिलाच्या मालकीच्या जमिनीवरील बांधकाम हे मुंबई – वडोदरा द्रुतगती मार्गाच्या भुसंपदानात जात असल्याने सदर बांधकामाचे मुल्यांकन करून अहवाल देण्याकरीता वरील नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडे रूपये १,००,०००/– रूपये (एक लाख) लाचेची मागणी केली व त्याशिवाय अहवाल मिळणार नाही असे सांगितले.<br>तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०९/०९/२०२१ रोजी पडताळणी केली असता नमुद लोकसेवक यांनी तक्रारदार यांच्याकडून यापूर्वी ४,००,०००/– रूपये स्विकारल्याचे मान्य करून आणखी १ लाख रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार ला.प्र.वि., ठाणे युनिटने आज दि. १३/०९/२०२१ रोजी सापळयाचे आयोजन करून लोकसेवक **अविनाश पांडुरंग भानुशाली** यांनी तक्रारदार यांच्याकडून रूपये १,००,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारताना त्यांच्या कल्याण येथील कार्यालयात रंगेहात पकडण्यात आले. |

**मार्गदर्शन अधिकारी :– मा. डॉ. पंजाबराव उगले, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि., ठाणे परिक्षेत्र, ठाणे**

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे परिक्षेत्र, ठाणे यांच्याशी संपर्क करावा.

---


संपर्क पत्ता :– ला.प्र.वि., ठाणे, मध्यवर्ती कारागृहासमोर, ठाणे पश्चिम, ४००६०१

संकेतस्थळ :– acbmaharashtra@mahapolice.gov.in

ई – मेल :– spacbthane@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री नं. :– १०६४

दुरध्वनी क्र. :– ०२२/२०८१३५९९

व्हॉटस्ॲप नं. :– ९९३०९९७७००.


( निलीमा कुलकर्णी )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, ठाणे